## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १९ :-कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत दिनांक २३ व २४ जानेवारी २०२६ रोजी " बोध,मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता " (कॉग्निजन ह्युमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे . या परिषदेसाठी देश- विदेशातून तज्ञ वक्ते सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दिनांक २३ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन होणार आहे .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही.के. सिंग, विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा.मनीष जोशी तर बीजभाषक म्हणून मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन गोह उपस्थित राहणार आहेत. तसेच मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठात होणाऱ्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत वेगवेगळ्या सहा सत्रात आंतरराष्ट्रीयकीर्तीचे वक्ते मार्गदर्शन करणार असून प्राप्त झालेल्या संशोधन पेपर्सचे सादरीकरण ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही माध्यमातून होणार आहे. दिनांक २३ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनानंतर हैदराबाद विद्यापीठ येथील प्रा. राजीव वनकर, जॉनाथन डूने,जापान येथील प्रा. केनजी डोया मार्गदर्शन करतील. त्यानंतर सायंकाळी .६.३० सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी दि.२४रोजी जीएसएफसी विद्यापीठ वडोदरा येथील कुलगुरू प्रा. जी. आर. सिन्हा, बिट्स पिलानी हैदराबाद येथील प्रा. परेश सक्सेना, सुरत येथील डॉ. सुनिलकुमार मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ वाजता विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.प्रा. जी. आर. सिन्हा,

मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन , नागपूर येथील आंबेडकर स्कूल ऑफ गव्हर्नमेंट चे संचालक मंगेश दहिवाले यांच्यासह अधिष्ठाता प्रा. एस.एस. राजपूत, प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी सर्वोत्कृष्ट सादरीकरण आणि संशोधन पेपर्सला पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश रामटेके यांनी दिली. दोन दिवस होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी व्हावे असे आवाहन संचालक प्रा.. डॉ. राकेश रामटेके, प्रा . एस.आर.कोल्हे,सचिव डॉ. अजय सुरवाडे, समन्वयक डॉ.अजय पाटील, सहसमन्वयक डॉ. राम भावसार यांनी केले आहे.

**आंतरराष्ट्रीय परिषदपूर्व २२ रोजी कार्यशाळा** : त्यापूर्वी दिनांक २२ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद पूर्व कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून एमकेसीएलचे चीफ मेंटर विवेक सावंत तर प्रमुख अतिथी म्हणून एमकेसीएलचे मुख्य व्यवस्थापक अमित रानडे (पुणे ), सायबर सुरक्षा नाशिकचे तन्मय दीक्षित यांच्यासह प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. उपस्थितीचे आवाहन संगणकशास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, निमंत्रक डॉ. संदीप भामरे, समन्वयक प्रा. सुरेंद्र कापसे यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १९ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे पौगंडावस्थेतील आदिवासी मुलींच्या शारिरीक व मानसिक स्वास्थावर योग व ध्यानाचा प्रभाव अभ्यासणे अंतर्गत मासिक रज:प्रवृत्तीच्या स्वास्थ्या संदर्भात योग प्रशिक्षण कार्यशाळेच्या दि. १७ जानेवारी, २०२६ रोजी समारोपाच्या वेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, सी.ए.डी.पी. प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक प्रा. किशोर विश्वकर्मा, डी.एस.टी. प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक तथा योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, शहादा बी.ए.आय.एफ. च्या प्रोग्रॅम मॅनेजर सोनाली सोनवणे, यावल प्रकल्पाच्या हर्षाली जावळे उपस्थित होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अतिथी अरुण पवार यांनी त्यांच्या मनोगतात वारंवार मिळणाऱ्या विद्यापीठाच्या सहकार्याबद्दल प्रकर्षाने उल्लेख केला तसेच असे सामाजिक उपक्रम राबविल्या बद्दल त्यांनी विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाचे विशेष आभार मानले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यापीठ आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी नंदुरबारच्या शैक्षणिक ॲकॅडमी द्वारे स्थानिक गरजेनुसार विद्यार्थ्यांसाठी सोयीसुविधा आणि विशेषत: संशोधनावर नेहमीच अग्रेसर असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी विद्यार्थीनींना प्रेरणादायक एक गोष्ट सांगून उज्वल भविष्याचे योगप्रशिक्षक बनण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा.किशोर विश्वकर्मा यांनी सी.ए.डी.पी. आणि डी.एस.टी. प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रकल्पाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लीना चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी केले.

या प्रशिक्षणामध्ये मुख्यत: पौगंडावस्थेतील आदिवासीच्या मासिक रजककालीन समस्यांशी निगडीत शारीरिक व मानसिक स्वास्थ कसे जपावे यासाठी सूर्यनमस्कार, कंधरासन, पश्चिमोत्तानासन, भुजंगासन व भ्रामरी प्राणायाम या विषयी शास्त्रोक्त ज्ञान व

प्रात्यक्षिकांचा अभ्यास डॉ. लीना चौधरी, फिल्ड वर्कर डॉ. सरिता महाजन, जागृती मोरे यांनी घेतला. या वेळी या सर्व मुलींची पल्मनरी फंक्शन टेस्ट व मासिक पाळीच्या समस्यांशी निगडीत प्रश्नावली भरून घेण्यात आली. तसेच त्यांच्यासाठी मार्गदर्शनपर पुणे येथील बी.ए.आय.एफ. पुणे च्या प्रोग्रॅम मॅनेजर डॉ. पुनम पाटील यांचे पौगंडावस्थेतील मुलीचे स्वास्थ व योगाभ्यास, स्त्री रोग तज्ञ डॉ. भावना चौधरी यांचे पौगंडावस्थेतील मुलींचे शारिरिक मानसिक वाढ व त्या दरम्यान येणाऱ्या समस्या आणि डॉ. राहुल मयुर यांचे माइंड युअर माइंड (मानसिक स्वास्थ) या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हार्टफुलनेस एज्युकेशन ट्रस्ट, हैदराबाद च्या क्षेत्रीय समन्वयक श्रीमती मीनाक्षी पाटील व अपूर्वा अग्रवाल यांनी हार्टफुलनेस मेडीटेशन घेतले.

राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन प्रायोजित प्रकल्प- सिलेज आधारित क्षेत्र विकास कार्यक्रम प्रकल्प तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, दिल्ली, केंद्रशासन प्रायोजित प्रकल्प, "पौगंडावस्थेतील आदिवासी मुलींच्या शारिरीक व मानसिक स्वास्थावर योग व ध्यानाचा प्रभाव अभ्यासणे" या प्रकल्पांतर्गत हे आयोजन योगशास्त्र विभागातील योग हॉल मध्ये करण्यात आले होते. यामध्ये आदिवासी विकास प्रकल्प यावल विभागाच्या 20 विद्यार्थिनी व आदिवासी विभाग प्रकल्प नंदुरबार विभागाच्या 26 विद्यार्थिनी आणि 6 शिक्षिका सहभागी झाल्या होत्या. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा.गितांजली भंगाळे, प्रा.लिंता चौधरी, रत्नाकर सोनार, अधिकार पाटील, भगवान साळुंखे यांनी सहकार्य केले.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १९ :-राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव केंद्रामार्फत 'फिरती विज्ञान प्रयोगशाळा' उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण करणे आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञान समजून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. माननीय कुलगुरू प्रा. विजय एल. माहेश्वरी तसेच माननीय प्र-कुलगुरू प्रा. सोपान टी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतील शाळा व महाविद्यालयांना या फिरत्या प्रयोगशाळेमार्फत भेटी देण्यात येत आहेत. या प्रदर्शनामध्ये भौतिकशास्त्र, जीवनशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, सूक्ष्मजैवशास्त्र व गणित या विषयांतील एकूण ३० शैक्षणिक प्रयोगांचा समावेश आहे. मानवी शरीराचा टॉर्सो मॉडेल, सूक्ष्मदर्शक प्रयोग, प्रतिकार मोजणी उपकरणे, चुंबकत्व, न्यूटनचे क्रेडल, विद्युतचुंबकीय प्रेरण यांसारख्या प्रयोगांमुळे विद्यार्थ्यांना विज्ञान प्रत्यक्ष अनुभवता येत आहे.

दिनांक 08/01/2026 रोजी मिल्लत हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मेहरूण, जळगाव येथे अब्दुल अहमद (Team Leader), कल्याणी शिरसागर, मयुरी गिरासे, आकाश वाणी व राखी शिरसाठ यांच्या पथकाने भेट दिली होती आणि 775 विद्यार्थी सहभागी झाले होते. दिनांक 10/01/2026 रोजी जे.ई. स्कूल, मुक्ताईनगर येथे सौ. वृंदा पाटील, सौ. अस्मिता पाटील, श्री. राहुल व्ही. हजारी, रोहित भोई व पराग जाधव यांच्या उपस्थितीत 135 विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला होता. तसेच कै. गणपतराव खडसे आश्रम शाळा, कोठली, मुक्ताईनगर येथे 110 विद्यार्थी सहभागी झाले होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न राहता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान शिकण्याची संधी मिळत असून, भविष्यातील संशोधक, अभियंते व शास्त्रज्ञ घडविण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. वरील सर्व भेटींना विद्यार्थी, शिक्षक व शाळा प्रशासनाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी प्रयोग प्रत्यक्ष करून पाहताना मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला, तर शिक्षकांनी या उपक्रमामुळे विज्ञान विषय अधिक रंजक व समजण्यास सोपा होत असल्याची भावना व्यक्त केली. अनेक शाळांनी भविष्यातही अशा प्रकारच्या विज्ञानविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत या उपक्रमाचे समन्वयक प्रा. संजय एस. घोष यांनी आवाहन केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १९ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव (प्रतिनिधी) दि. १९ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राअंतर्गत १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जात आहे. या निमित्ताने आज दि. १९ जानेवारी २०२६ रोजी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मान्यवर कवींचे कवी संमेलन पार पडले. याप्रसंगी जळगाव येथील कवयित्री पुष्पा साळवे, वडजी ता. भडगाव येथील कवी डॉ. वाल्मीक अहिरे आणि धुळे येथील कवी अरविंदा भामरे यांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

या कवी संमेलनाच्या तीन फेऱ्या पार पडल्या. त्यापैकी पहिल्या फेरीत कवयित्री पुष्पा साळवे यांनी 'श्रमिक' नावाची कविता सादर करून श्रमिक जीवनाचे महत्व अधोरेखित केले. डॉ. वाल्मीक अहिरे यांनी 'जा मी नाही खात' नावाची बालकविता सादर करून लहान मुलीचे भावविश्व डोळयासमोर उभे केले. अरविंदा भामरे यांनी त्यांच्या 'आसवांचा विद्रोह' या कवितासंग्रहातील कविता सादर करत जातीपातीच्या भेदाभेदातील माणसे यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी त्यांच्या 'बा, तथागता!' या विशाल काव्यातील प्रथम आविष्करणामधील विवेकी सत्याचा शोध घेणारे उद्धरण सादर केले. तसेच याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून कविता सादर करताना कविते संदर्भातील भूमिका स्पष्ट करताना म्हणाले की, साहित्यिक हा कोणत्या स्तुतीसाठी साहित्याची निर्मिती करत नसतो तर त्याच्या अनुभवातून आलेली कवीची परिपक्व जाणीव ही प्रभावीपणे सर्वव्यापक व्हावी विस्तारित जावी हीच अपेक्षा असते.

कवींच्या कवी संमेलनाच्या दुसऱ्या फेरी प्रसंगी कवयित्री पुष्पा साळवे यांनी 'पुस्तक' नावाची कविता सादर करून पुस्तके माणसाला जगण्याचे बळ देतात यावर प्रकाश टाकला. डॉ. वाल्मीक अहिरे यांनी 'काळया काळया पोरीसंग लगीन लावलं मामांनं' या कवितेतून रंग रूपापेक्षा गुण महत्त्वाचे असतात असे अधोरेखित करणारी कविता सादर करत वातावरणाला हलकेफुलके केले. कवी अरविंदा भामरे यांनी या फेरीत 'लेकरांसाठीची आई' ही कविता सादर करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या बायकोचे जीवन उलगडून दाखविले. या फेरीत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.पगारे यांनी 'प्रज्ञास्पंदनेचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथातील 'मृत्यू' या विषयावर भाष्य करत जोपर्यंत अज्ञान आहे, तोपर्यंत माणूस भयाला गोंजारत राहतो मात्र त्याला ज्ञान प्राप्त झाले की, सत्याला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त होते आणि प्रसंगी मृत्यूलाही भिडण्याची तयारी दर्शविण्याची क्षमता मानवाला प्राप्त होते. अशा स्वरूपाचे सुंदर असणाऱ्या मृत्यू विषयक भाष्य करणाऱ्या कवितेतील काही वेचांचे सादरीकरण कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पगारे यांनी केले.

"बाईपण निभावतांना
घालमेल होते जीवाची
आयुष्याच्या खस्ता खातांना
जीवही होऊन जातो सरावलेला"
असे म्हणत

या कवी संमेलनाच्या तिसऱ्या फेरीत कवयित्री पुष्पा साळवे यांनी मुलगी, बहीण, पत्नी, आई या भूमिका साकारणाऱ्या स्त्रीच्या बाईपणाच्या वेदनांना 'बाईपण' या कवितेतून सादर केले.

"माझ्या आंधळया बापान मला उजेड दाविला
त्याच्या उपकाराचा कसा खोलू मी झोला"
असे म्हणत

कवी डॉ. वाल्मीक अहिरे यांनी 'बाप' या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार त्यांच्या बापाने कसा आत्मसात केला होता हे वर्णन केले.

"ती म्हणाली शिपायाला फाईल तयार आहे घेऊन जा,
शिपाई तिला म्हणाला अगं वेडी बया,
वर्षांनुवर्ष फाईल तीच आहे,

फक्त खुर्चीवरची बाई बदलली आहे."

अशा कवितेच्या ओळीतून कवी अरविंदा भामरे यांनी 'फाईल' नावाची कविता सादर करत सरकारी दप्तर दिरंगाई तसेच बेरोजगार तरुणाचा त्याच्या बायको सोबतचा संवाद कवितेतून सादर केला. या तिसऱ्या फेरीत प्रशाळेतील मराठी विभागातील डॉ. भारती सोनवणे यांनी त्यांची 'तिच्या जखमांचा नासुर' नावाची कविता सादर केली. सोबतच प्रशाळेतील एम. ए. इंग्रजी द्वितीय वर्षाचा विद्यार्थी योगेश पाटोळे याने देखील त्याची स्वलिखित 'बाप' नावाची कविता सादर करून बाप नसणाऱ्या मुलाचे दु:ख यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. म. सु. पगारे यांनी 'बा, तथागता!' या विशाल काव्यामधील प्रथम आविष्करणामधील शेवटच्या वेचांमधून माणसाला संबोधून माणूसपणाचे मर्म समजून सांगणाऱ्या ओळी सादर करून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. भारती सोनवणे यांनी तर आभार डॉ. दीपक खरात यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १९ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता